पुढारी

# राष्ट्रीय सहकारी संघाकडून 'रवळनाथ'ला ४ लाखांचे अनुदान

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

नवी दिल्ली येथील भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाकडून श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीला ४ लाखांचे अनुदान मिळाले, अशी माहिती संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.



**एम. एल. चौगुले**

चौगुले म्हणाले, भारतीय सहकारी संघ ही देशातील सहकार चळवळीतील शिखर संस्था आहे. या संस्थेतर्फे सहकार चळवळीच्या वाढीसाठी दरवर्षी विविध नावीण्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. रवळनाथला मिळालेल्या ४ लाखांच्या अनुदानापैकी ३ लाख रुपये सभासदांच्या प्रशिक्षणासाठी तर १ लाख रुपये संस्थेच्या तंत्रज्ञान विभागाच्या विस्तारीकरणासाठी मिळाले आहेत. यापूर्वी संघाकडून 'रवळनाथ'ला अनुदान मिळाले होते. त्यातून संस्थेच्या सभासदांसाठी गडहिंग्लज, बेळगाव येथे 'बहुराज्य कायदा-२००२ नुसार सभासदांचे अधिकार, कर्तव्य आणि जबाबदारी' या विषयावर प्रशिक्षण शिबिरे घेण्यात आली. तसेच, संघाच्या संयुक्त विद्यमाने 'कोविडोत्तर काळातील सहकारी संस्थांसमोर आव्हाने व उपाययोजना' या विषयावरील राष्ट्रीय पातळीवरील वेबिनारदेखील घेण्यात आले. त्याला देशभरातून चांगला प्रतिसाद मिळाला.

My Kolhapur Edition
Nov 13, 2020 Page No. 10
newspaper.pudhari.co.in

कीर्तिवंत

13 November 2020-page-3

# दिल्लीच्या राष्ट्रीय सहकारी संघाकडून 'रवळनाथ'ला ४ लाखाचे अनुदान

**गडहिंग्लज (प्रतिनिधी) :**

नवी दिल्ली येथील भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाकडून श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीला ४ लाखाचे अनुदान मिळाले, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.



अध्यक्ष एम. एल. चौगुले म्हणाले, भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ ही देशातील सहकार चळवळीतील शिखर संस्था आहे. या संस्थेतर्फे सहकार चळवळीच्या वाढीसाठी दरवर्षी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात.

'रवळनाथ'ला मिळालेल्या ४ लाखाच्या अनुदानापैकी ३ लाख रूपये सभासदांच्या प्रशिक्षणासाठी तर १ लाख रूपये संस्थेच्या तंत्रज्ञान विभागाच्या विस्तारीकरणासाठी मिळाले आहेत.

यापूर्वी संघाकडून रवळनाथ संस्थेला अनुदान मिळाले होते. त्यातून संस्थेच्या सभासदांसाठी गडहिंग्लज, बेळगाव येथे बहुराज्य कायदा २००२ नुसार सभासदांचे अधिकार, कर्तव्य आणि जबाबदारी या विषयावर प्रशिक्षण शिबिरे घेण्यात आली. तसेच संघाच्या संयुक्त विद्यमाने कोविडोत्तर काळातील सहकारी संस्थांसमोरील आव्हाने व उपाययोजन या विषयावरील राष्ट्रीय पातळीवरील वेबीनार देखील घेण्यात आले. त्याला देशभरातून चांगला प्रतिसाद मिळाला. लवकरच पुन्हा अशा सभासद प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येईल, असेही अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी यावेळी सांगतले.

सकाळ

# राष्ट्रीय सहकारी संघाकडून 'रवळनाथ'ला चार लाख

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. १२ : दिल्ली येथील भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाकडून श्री. रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटीला चार लाखांचे अनुदान मिळाले, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

चौगुले म्हणाले, ''भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ ही देशातील सहकार चळवळीतील शिखर संस्था आहे. या संस्थेतर्फे सहकार चळवळीच्या वाढीसाठी दरवर्षी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. रवळनाथला मिळालेल्या चार लाखांच्या अनुदानापैकी ३ लाख रुपये सभासदांच्या प्रशिक्षणासाठी, तर एक लाख रुपये संस्थेच्या तंत्रज्ञान विभागाच्या विस्तारीकरणासाठी मिळाले आहेत. यापूर्वी संघाकडून



**एम. एल. चौगुले**

रवळनाथला अनुदान मिळाले होते. त्यातून संस्थेच्या सभासदांसाठी गडहिंग्लज, बेळगाव येथे बहुराज्य कायदा-२००२ नुसार सभासदांचे अधिकार, कर्तव्य व जबाबदारी या विषयावर प्रशिक्षण शिबिरे घेण्यात आली. संघाच्या संयुक्त विद्यमाने कोविडोत्तर काळातील सहकारी संस्थासमोरील आव्हाने व उपाययोजना या विषयावरील राष्ट्रीय पातळीवरील वेबिनार देखील घेतले. त्याला देशभरातून चांगला प्रतिसाद मिळाला. लवकरच पुन्हा अशा सभासद प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात येईल, असेही चौगुले यांनी या वेळी सांगितले.

# राष्ट्रीय सहकारी संघाकडून 'रवळनाथ'ला ४ लाख अनुदान

प्रतिनिधी
गडहिंग्लज

नवी दिल्ली येथील भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाकडून रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीला चार लाखाचे अनुदान मिळाल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

श्री. चौगुले म्हणाले, राष्ट्रीय सहकारी संघ ही देशातील सहकार चळवळीतील शिखर संस्था आहे. या संस्थेतर्फे सहकार चळवळीच्या वाढीसाठी दरवर्षी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. रवळनाथला मिळालेल्या चार लाखाच्या अनुदानापैकी तीन लाख रुपये सभासदांच्या प्रशिक्षणासाठी तर एक लाख रुपये संस्थेच्या तंत्रज्ञान विभागाच्या विस्तारीकरणासाठी मिळाले आहेत. यापूर्वी रवळनाथला अनुदान मिळाले होते. त्यातून संस्थेच्या सभासदांसाठी गडहिंग्लज, बेळगाव येथे बहुराज्य कायदा-२००२ नुसार सभासदांचे



एम. एल. चौगुले

अधिकार, कर्तव्य आणि जबाबदारी या विषयावर प्रशिक्षण शिबीरे घेण्यात आली. तसेच कोविडोत्तर काळातील सहकारी संस्थांसमोरील आव्हाने व उपाययोजना या विषयावरील राष्ट्रीय पातळीवरील वेबीनार देखील घेण्यात आले. त्याला देशभरातून चांगला प्रतिसाद मिळाला. लवकरच पुन्हा अशा सभासद प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे श्री. चौगुले यांनी सांगितले.